# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)


दूरध्वनी क्र.
०२०–२५६२१०४५/४८
/४९
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष


संदर्भ क्र.:आयक्यूएसी/५५७

दिनांक : २९.०७.२०२२

**अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ उपकेंद्र,
प्रस्तुत विद्यापीठ/**(अहमदनगर आणि नाशिक).**

**विषयः—आविष्कार संशोधन स्पर्धा २०२२—२३ शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांची कार्यशाळा.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी संशोधन स्पर्धा (आविष्कार, अन्वेषन) इनोव्हेशन परिषद, अध्यापकांचे संशोधन प्रकल्प यासारखे उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मध्ये सदर उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाविद्यालये/परिसंस्थेने नेमलेल्या शैक्षणिक व संशोधन समन्वयकांची **(ARC) कार्यशाळा** खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.

१. **गुरूवार, दिनांक ०४ ऑगस्ट,** २०२२ रोजी नाशिक, के.टी.एच.एम. महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक—२. येथे **वेळ — सकाळी ०९:०० ते ११:३० वा. — नाशिक जिल्हयासाठी**
२. **गुरूवार, दिनांक ०४ ऑगस्ट,** २०२२ रोजी संगमनेर नगर पालिका, कला डी.जे. मालपाणी वाणिज्य आणि बी.एन.सारडा विज्ञान महाविद्यालय, ता. संगमनेर, जि. अहमदनगर. **वेळ — दुपारी ३:०० ते ५:०० वा. — अहमदनगर जिल्हयासाठी**

**('शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (ARC) यांचा प्रवास भत्ता/प्रवास खर्च संबधित महाविद्यालयांनी करावा.)**

सदर सभेला मा. कुलगुरू व मा. प्र—कुलगुरू उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी आपल्या महाविद्यालये/परिसंस्थेतील नेमणूक केलेल्या **'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (ARC)** यांची उपस्थिती अनिवार्य असल्याने त्यांना सदर सभेस उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.

**कृपया, यापूर्वी निर्गमित केलेले या विभागाचे संदर्भ क्र.:आयक्यूएसी/५४१ दि. १४/०७/२०२२ आणि आयक्यूएसी/५४४ दिनांक : २०.०७.२०२२रोजीचे परिपत्रक रद्द समजावे.**

कळावे,

(डॉ. सुप्रिया पाटील)
संचालक